ऐक्य

# यशोदा टेक्निकल कॅम्पसमधील विद्यार्थ्यांचा 'सायबर सेफ राजधानी सातारा' उपक्रम



यशोदा टेक्निकल कॅम्पसचे विद्यार्थी.

▲ **सातारा,** दि. ९ : यशोदा टेक्निकल कॅम्पस, सातारा येथील संगणक विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'सायबर सेफ राजधानी सातारा' या सामाजिक उपक्रमांतर्गत सायबर सुरक्षेच्या जनजागृतीसाठी एक महत्त्वपूर्ण आणि स्तुत्य अभियान राबवले. हा उपक्रम क्विक हिल फाउंडेशन व महाराष्ट्र पोलीस सायबर सेल यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पडला.

यशोदा टेक्निकल कॅम्पसतर्फे आयोजित आरंभ २०२५ विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी पथनाट्ये घोषवाक्ये, माहितीपत्रके आणि तंत्रज्ञानविषयक प्रात्यक्षिके सादर केली. इंटरनेट हॅकर्सचे शिकार होण्यापासून वाचूया, ओटीपी आणि आधार क्रमांक कुणालाही शेअर करू नका अशा संदेशांनी नागरिकांचे लक्ष वेधले.

कार्यक्रमात सायबर सुरक्षेच्या मूलभूत गोष्टी, मजबूत पासवर्डचा वापर, संशयास्पद लिंक्स टाळणे, सोशल मीडियावर वैयक्तिक माहितीची गोपनीयता राखणे यावर भर देण्यात आला. या माहितीमुळे नागरिकांना रोजच्या डिजिटल वापरामध्ये अधिक सुरक्षितता बाळगण्याचे महत्त्व समजले.

कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थ्यांनी घेतलेल्या सायबर सुरक्षेच्या प्रतिज्ञेने झाला. आपण सर्वजण इंटरनेट वापरताना जबाबदारीने वागू, कोणत्याही आमिषाला बळी पडणार नाही आणि आपल्या मित्र परिवारालाही सुरक्षित इंटरनेट वापरासाठी प्रोत्साहित करू ही प्रतिज्ञा करण्यात आली.

या उपक्रमात प्राचार्य डॉ. विक्रम पाटील, संगणक विभाग प्रमुख डॉ. सरिता बलशेटवार आणि क्विक हिलसाठी समन्वयक प्रा. शीतल वाघमारे यांची विशेष उपस्थिती होती. यशोदा टेक्निकल कॅम्पसचे उपाध्यक्ष प्रा. अजिंक्य सागरे विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक करताना म्हणाले, आजच्या युगात सायबर सुरक्षा ही केवळ वैयक्तिक गरज नसून सामाजिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी हे जाणून समाजासाठी पुढाकार घेतला, ही कौतुकास्पद गोष्ट आहे. त्यांनी या उपक्रमासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा पुरवून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.